दूरध्वनी क्रमांक : २५५०११२३
**पुणे महानगरपालिका**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
**अपिल प्राधिकारी तथा**
**उप आयुक्त(सामान्य प्रशासन) यांचे कार्यालय,**
जा.क्र.अपिल/०२/२०१७/उआ(सा.प्र.)/ 9304
दिनांक :- 08/03/2017

**उप आयुक्त (सामान्य प्रशासन) यांचे कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**

**अपिल क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा. तथा उप आयुक्त (सा.प्र.)/अपिल/२/२०१७**

**अपिलकर्त्याचे नांव व पत्ता :-**
श्री.चंद्रभान उमेदसिंह भदौरिया,
स.नं.८२,लोहगाव वाघोली रोड,
पुणे – ४११ ०४७

**जन माहिती अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा :-**
श्री.शाम तारु, प्रशासन अधिकारी,
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

श्री.चंद्रभान उमेदसिंह भदौरिया – अपिलार्थी
विरुध्द
जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

अपिलकर्ता **श्री.चंद्रभान उमेदसिंह भदौरिया** यांनी दिनांक १३/१२/२०१६ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग , पुणे महानगरपालिका यांचेकडे अर्ज करून **कनिष्ठ अभियंता यांत्रिकी पदाचे भरती प्रक्रिया २०१६ बाबत खालीलप्रमाणे Question ID (408192772 ) (408192772 ) (408192764) (408192799) या प्रश्नांची उत्तरे कोणत्या आधारे किंवा पुराव्याने किवा पुस्तकातून दिलेली आहेत याबद्दल** सविस्तर माहिती मागीतली आहे.

अपिलार्थी यांना मा. जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग यांनी दि. १३/१२/२०१६ रोजी लेखी माहिती पाठविली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करुन द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| १३/१२/२०१६ | १२/१/२०१७ | १३/१२/२०१६ | | १३/१२/२०१६ |

अपिलकर्ता यांनी माहिती समाधानकारक नसल्याचे कारण नमूद करुन दिनांक १६/०१/२०१७ रोजी प्रथम अपिल अर्ज दाखल केला आहे.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| १२/१/२०१७ | १६/१/२०१७ | नाही | - | ३०/१/२०१७ |

सदर अपिलाची सुनावणी दिनांक १०/०२/२०१७ रोजी दुपारी ४.३० वाजता आयोजित केली होती. सुनावणीस अपिलकर्ता श्री.चंद्रभान उमेदसिंह भदौरिया हे उपस्थित होते. तसेच श्री. शाम तारू, जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी , आस्थापना विभाग, पुणे मनपा व श्री. चेतन कबाडे, प्रशासन अधिकारी हे उपस्थित होते.

जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशिल :-

| **अ.क्र** | **अर्जदाराने मागितलेली माहिती** | **जन माहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती** |
|---|---|---|
| १. | कनिष्ठ अभियंता यांत्रिकी पदाचे भरती प्रक्रिया २०१६ बाबत खालीलप्रमाणे Question ID (408192772 ) (408192772 ) (408192764) (408192799) या प्रश्नांची उत्तरे कोणत्या आधारे किंवा पुराव्याने किवा पुस्तकातून दिलेली आहेत याबद्दल सविस्तर माहिती | प्राप्त हरकती व सूचना विचारात घेवून मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांचे स्तरावर coep ,पुणे या संस्थेमधील संबंधित विषयातील तज्ञ विभागप्रमुख यांचेकडून फेरतपासणी करुन अंतिम करणेत आलेली उत्तरतालिका महाऑनलाईन सिस्टीममध्ये अपलोड केली आहे असे दि.१३/१२/२०१६ रोजी लेखी कळविले आहे. |

## विवेचन

सुनावणीच्या वेळी अपिलकर्ता श्री. श्री.चंद्रभान उमेद्सिंह भदौरिया हे उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि .१३/१२/२०१६ रोजी **प्राप्त हरकती व सूचना विचारात घेवून मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांचे स्तरावर coep ,पुणे या संस्थेमधील संबंधित विषयातील तज्ञ विभागप्रमुख यांचेकडून फेरतपासणी करुन अंतिम करणेत आलेली उत्तरतालिका महाऑनलाईन सिस्टीममध्ये अपलोड केली आहे** असे दि.१३/१२/२०१६ रोजी लेखी कळविले असल्याचे प्रतीपादन केले.

<u>आदेश</u>

अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. १३/१२/२०१६ रोजी कळविण्यात आलेले उत्तर योग्य आहे.

अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश बोरसे)
**अपिल प्राधिकारी तथा**
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

8/3/2017

दिनांक :-८/०३/२०१७

ठिकाण :- पुणे

टीप :-

१) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय ईमारत, ४ था मजला, पुणे - १ यांचेकडे द्वितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

२) या आदेशाची प्रत पुणे मनपा च्या **www.punecorporation.org** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.